विद्युत निरीक्षक संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदल्या
आदेशात बदल

महाराष्ट्र शासन
उद्योग, उर्जा व कामगार विभाग
शासन आदेश क्रमांक: मुविनि-२०१७/प्र.क्र. ४४३/उर्जा-५
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ०६ मार्च, २०१८.

वाचा:- शासन आदेश क्रमांक: मुविनि-२०१७/प्र.क्र. १८१/उर्जा-५ दि. ३१ ऑगस्ट, २०१७ .

शासन आदेश:-

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४ (४) व ४ (५) मधील तरतूदीनुसार विद्युत निरीक्षणालय शाखेतील अधिकारी/ कर्मचारी यांच्या बदल्यांचे अधिकार अधिसूचित केल्यानुसार, सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने, श्री. विकास तारु राठोड, विद्युत निरीक्षक ठाणे क्र. २ यांची उपरोक्त दि. ३१/०८/२०१७ च्या शासन आदेशान्वये विद्युत निरीक्षक, बीड येथे बदली करण्यात आली होती परंतु प्रशासकीय कारणास्तव सध्याच्या पदावर म्हणजे विद्युत निरीक्षक , ठाणे क्र. २ या पदावर त्यांना १ वर्ष (पुढील सार्वत्रिक बदल्यापर्यंत म्हणजे मे २०१८ पर्यंत) मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. तसेच या आदेशान्वये करण्यात आलेल्या बदल्या रद्द करणे किंवा त्यात बदल करणे यासाठी राजकीय दडपण/दबाव आणल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित विद्युत निरीक्षक महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ अनुसार शिस्तभंगाची कारवाई सुरु करण्यात येईल.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३०६१४५४५०९८१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Bhimashankar Yallappa Manta

Digitally signed by Bhimashankar Yallappa Manta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries,Energy And Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=873ce9a279d9561ff0cbf658e05b823c67c79dcac309fc4ebdac035d6aeec2a0, cn=Bhimashankar Yallappa Manta
Date: 2018.03.06 14:58:50 +05'30'

(भि. य. मंता)
शासनाचे उपसचिव

प्रती,

१) मुख्य विद्युत निरीक्षक, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, प्रशासकीय इमारत, ३ रा मजला, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर (पू.) मुंबई-७१.
२) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र नागपूर.
३) अधिदान व लेखा अधिकारी मुंबई/ निवासी लेखाधिकारी, मुंबई.
४) जिल्हा कोषागार अधिकारी ठाणे/ बीड
५) उपसचिव (ऊर्जा-५), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६) श्री. विकास तारु राठोड, विद्युत निरीक्षक, विद्युत निरीक्षक, ठाणे क्र. २
७) निवड नस्ती ऊर्जा-५.

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा. मंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव
४) प्रधान सचिव (ऊर्जा) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.